आजचा दिनविशेष
१९९६ : पांडुरंगशास्त्री आठवले यांना मॅगसेसे पुरस्कार.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १ सप्टेंबर २०२५ | अंक २५२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# आता शेतकरी रस्त्यावर उतरणार, थेट रस्ता रोको आणि रेल रोको करणार, कारण काय?

## आर्थिक नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल

सध्या कांद्याचे उत्पादन घेण्यासाठी प्रती क्विंटल सुमारे 2,500 खर्च येतो, मात्र बाजारपेठेत मिळणारे दर त्याहून खूपच कमी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रती क्विंटल सुमारे ₹1,500 चा तोटा सहन करावा लागत आहे. या आर्थिक नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे, असेही भारत दिघोळे म्हणाले.



गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर परिस्थितीमुळे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. जर सरकारने कांद्याला किमान 1,000 रुपये प्रति क्विंटल अनुदान दिले नाही आणि येत्या काळात कांद्याचे बाजारभाव किमान 3,000 रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचले नाहीत, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनात रस्ता रोको आणि रेल रोकोचा समावेश असेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान संघटनाने सरकारकडे अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. कांद्यावरील सर्व निर्बंध तातडीने हटवावेत. कांदा निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी त्यांची मुख्य मागणी आहे. देशांतर्गत बाजारभाव स्थिर ठेवण्यासाठी निर्यात थांबवणे हा उपाय चुकीचा आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे निर्यातीला सबसिडी देऊन परदेशात भारतीय कांद्याला स्पर्धात्मक बनवणे गरजेचे आहे, असेही भारत दिघोळे यांनी म्हटले. तर शेतकरी रस्त्यावर उतरतील

याव्यतिरिक्त, संघटनेने असाही आरोप केला आहे की, कांद्याचे दर वाढू नयेत यासाठी काही घटकांकडून जाणीवपूर्वक षड्यंत्र रचले जात आहे. या षड्यंत्रामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत आहे. त्यामुळे सरकारने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी पावले उचलावीत. जर सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर शेतकरी शांत बसणार नाहीत. येत्या काळात कांद्याचे बाजारभाव किमान ₹3,000 प्रति क्विंटल झाले नाहीत तर शेतकरी रस्त्यावर उतरतील आणि रस्ता रोको, रेल रोको यांसारखी आंदोलने करून सरकारचे लक्ष वेधून घेतील, असे भारत दिघोळे यांनी स्पष्ट केले.

# जरांगे पाटलांना साथ देण्यासाठी उपसभापती मोरे आझाद मैदानात



संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी कसेही घुसा पण मुंबईत दिसा या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत माजलगाव बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे हे आंदोलनस्थळी आझाद मैदान येथे सहभागी झाले असुन आरक्षण आंदोलनास पाठींबा दिला आहे. मराठा आरक्षण आंदोलनात सुरूवातीपासुनच सकारात्मक भुमिका घेत वेळोवेळी झालेल्या आंदोलने, सभा, बैठकांमध्ये हिरीरीने सहभाग घेत मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागे मोठी ताकद निर्माण करण्याचे काम उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केलेले आहे. आरक्षणप्रश्नी पुरूषोत्तमपुरी ग्रामपंचायतीच्या निवडणीकीवर बहिष्कार असो अथवा माजलगाव, बीड येथील जरांगे पाटलांची सभा, बैठक यासाठी नेहमीच सहभाग घेत मराठा आरक्षण आंदोलनात खारूताईचा वाटा त्यांनी उचललेला आहे. २९ ऑगस्टच्या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन मराठा आरक्षण योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांनी केले होते. या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत उपसभापती श्रीहरी नाना मोरे मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी होत आझाद मैदानावर दाखल झाले आहेत. त्यांच्यासमवेत बाजार समितीचे संचालक भगवान नाना आगे, कदिर भाई पठाण, नितीन पौळ, सुमित पौळ यांचा समावेश आहे.

# सीए गोविंद कदम यांचे सेट परीक्षेत यश



प्रतिनिधी । बीड दि.30 : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत जून महिन्यात घेण्यात आलेल्या सीईटी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत बीड जिल्ह्याचे सुपुत्र सीए गोविंद त्र्यंबकराव कदम यांनी वाणिज्य विषयात उत्तीर्ण होत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे. सध्या सीए गोविंद कदम हे बीड, माजलगाव आणि गेवराई या ठिकाणी प्रॅक्टिसिंग चार्टर्ड अकाउंटंट म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थीदशेपासून परिश्रम, चिकाटी आणि मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले. या यशामध्ये प्रा.चंद्रकांत तौर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल सीए बी.बी. जाधव, प्राचार्य चंद्रकांतराव गायकवाड, सीए नारायण गाडे, इंजि. सुदर्शन गवते आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. बीड जिल्ह्यातील तरुणांसाठी सीए गोविंद कदम यांचे यश प्रेरणादायी ठरत असून, त्यांच्या मेहनतीचे कौतुक होत आहे.

---------------

# शेख एहतेशाम यांची कॉंग्रेसच्या शहर उपाध्यक्ष पदी निवड



बीड (प्रतिनिधी)-शेख एहतेशमामुद्दीन शेख काझीमुद्दीन यांची कॉंग्रेसच्या शहर उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे . त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे व बीड शहरध्यक्ष परवेज कुरेशी यांची उपस्थितीमध्ये देण्यात आले.

भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पार्टीची नवीन कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली आहे..नक्कीच या पुढे पक्ष्याचा विस्तार आणि विकास या साठी आम्ही प्रयत्नशील असू.

त्यांच्या या निवडीचे ॲड अनिल बारगजे,ॲड जावेद मणियार,ॲड सतीश चव्हाण, ॲड झिने बन्सी, घुगे दादासाहेब, शेख सोहेल, कामरान खान , ॲड.सय्यद मोईन, रिजवान पटेल, सय्यद सलमान, अजहर शेख, साजिद खान, अयान पाशा आदींनी स्वागत केले आहे.

---------------

# लोकशाही पत्रकार संघाने हिंदू संस्कृती जपली - नवनाथ आण्णा शिराळे

बीड दि.२८(प्रतिनिधी)- गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून लोकशाही पत्रकार संघाने शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याची संस्कृती जपली असल्याचे मत नवनाथ आण्णा शिराळे यांनी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने स्थापन झालेल्या गणरायाच्या आरतीच्या प्रसंगी पदाधिकाऱ्यांशी बोलताना म्हटले. यावेळी त्यांनी बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन देखील नागरिकांना केले..



लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने धानोरा रोड परिसरात धानोरा रोडचा राजा गणेश मंडळाच्या नावाने गणरायाची स्थापना करण्यात आली. गणरायाच्या स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी भाजपचे बीड जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे यांच्या हस्ते श्री ची आरती करण्यात आली. आरती नंतर नवनाथ आण्णा शिराळे उपस्थित नागरिकांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी बोलत होते. यावेळी बोलताना नवनाथ आण्णा शिराळे म्हणाले की, सर्व सण आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून लोकशाही पत्रकार संघाने शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याची संस्कृती जपली आहे. त्याच प्रमाणे बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सणासह ईद सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा. सध्या महाराष्ट्रामध्ये मुसळधार पावसाचे वातावरण आहे. या वातावरणात प्रत्येक नागरिकांनी सुरक्षितरित्या रहावे स्वतःचे आणि आपल्या शेजाऱ्याची काळजी घ्यावी असे आव्हाने यावेळी नवनाथ आण्णा शिराळे यांनी नागरिकांना केले. आरती नंतर नवनाथ आण्णा शिराळे यांचा सत्कार लोकशाहीचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व पत्रकार नितेश उपाध्ये, संजय देवा कुलकर्णी यांनी केला. यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, साहस आदोडे, शिवप्रसाद सिरसाट, श्रीकांत कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

# भाजप बीड शहर तर्फे पर्यावरणपूरक व सामाजिक संदेश देणाऱ्या गौरी-गणपती आरास स्पर्धा

बीड (प्रतिनिधी) -भारतीय जनता पार्टी बीड शहराच्या वतीने यंदाच्या गौरी-गणपती उत्सवात सामाजिक बांधिलकी जोपासत पर्यावरणपूरक तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.भाजप सदस्या रुपाली देशपांडे यांनी सांगितले की, आजच्या काळात निसर्गरक्षण, प्रदूषणमुक्त सण व समाजातील जनजागृती या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. गणपती बाप्पाच्या आरासीतून जर पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून समाजाला संदेश दिला गेला तर तो खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरेल. अशा देखाव्यांना प्रोत्साहन देण्यासाठीच बक्षिसांची योजना जाहीर केली आहे. बक्षिसांची रचना पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे :

प्रथम बक्षीस : ३,०००
द्वितीय बक्षीस : २,०००
तृतीय बक्षीस : १,०००

भाजप बीड शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा फक्त उत्सव साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता समाजातील समस्या, पर्यावरण संवर्धन व सकारात्मक संदेश देणारे उपक्रम राबवणे आवश्यक आहे. त्यामुळे या आरास स्पर्धेला सर्व मंडळांनी उत्साहाने सहभागी व्हावे. या स्पर्धेतून गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणपूरक व समाजहिताचा संदेश देणाऱ्या मंडळांचा सन्मान होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नामस्मरण हे भगवंताच्या प्राप्तीचे सुलभ साधन आहे

## ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमात ह भ प माधव महाराज डाके यांचे प्रतिपादन

बीड प्रतिनिधी ज्ञानियांचे राजे साधकांचे मायबाप कैवल्य चक्रवर्ती सम्राट माऊली श्री. ज्ञानोबाराय यांच्या 750 व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एकावन्न श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमांतर्गत आज शनिवार दि.30 ऑगस्ट 2025 रोजी बीड शहरातील वाडिया वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे यांच्या घरी मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात ज्ञानेश्वरी ग्रंथाचे भव्य दिव्य स्वागत झाले.

यावेळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी ची ज्ञानदेव तुकाराम या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. उपक्रमाचे संयोजक ह.भ.प.माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधिवत पूजा करून सदरील ग्रंथ गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी शेंडगे ताई यांच्या हातात सुपूर्द केला. या नंतर डाके महाराजांनी ज्ञानेश्वरीतील नवव्या अध्यायातील नामजपाचे महात्म्य सांगणारी ओवी निवडून तासाभराचे श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महात्म्य सांगणारे प्रवचन केले.

सदरील या ओवीवर चिंतन मांडताना श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात नाम साधनेचे महत्व कसे प्रतिपादन केले आहे ते सांगितले.भगवंत प्राप्तीचे विविध मार्ग आहेत. परंतु यामध्ये सर्वात सुलभ साधना नामस्मरणआहे. हा सिद्धांत विविध दृष्टांत देऊन



जमलेल्या श्रोत्यांना आपल्या सोप्या भाषेत पटवून दिले . या प्रवचन सेवेमध्ये ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिलेला हरिपाठ, चांगदेव पासष्टी ,अमृत अनुभव व ज्ञानेश्वरी ग्रंथ यावर सविस्तर भाष्य केले .साधकांचे मायबाप ज्ञानोबारायांना माऊली का म्हटले जाते याचे उत्तर आपणास हरिपाठ मध्ये मिळते हे विशद केले.

शेंडगे परिवाराकडे ज्ञानेश्वरी ग्रंथाचे स्वागत गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी सौ.उषा गणेश शेंडगे यांनी केले.

ग्रंथराज ज्ञानेश्वरी आगमना निमित्त दारात सुंदर रांगोळी व फुलांची पख रण केलेली होती. गोरज मुहूर्तावर सांजवेळी श्री. ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रत्यक्ष ज्ञानोबारायाच आपल्या घरी येत आहेत हा भाव शेंडगे दांपत्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. यावेळी दारामध्ये सर्वत्र दिवे लावून दिपपूजन करण्यात आले.त्यानंतर श्री.ज्ञानेश्वरीचे पूजन केले. व महाराजांचे औक्षण केले .

घरोघरी एकावन्न ज्ञानेश्वरी सस्नेह भेट या उपक्रमांतर्गत कालच्या या कार्यक्रमाला आई रामकवर शेंडगे, ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, दैनिक चंपावती चे पत्रकार महादेव( नाना )साळुंके गणेश शेंडगे, गुरुप्रसाद शेंडगे, विणेकरी वाल्मीक मामा चाटे,श्रीराम जाधव, डोरले काका व काकू यांच्यासह शिंदे नगर कॉलनी परिसरातील भाविक भक्त व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. श्री.ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दैनिक चंपवतीपत्रचे महादेव (नाना) साळुंके यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी पसायदान व गणरायाची आरती करण्यात आली. आणि महाप्रसाद वाटप करण्यात आला....

कार्यक्रमाचे सुंदर नियोजन महादेव नाना साळुंके यांनी केल्याबद्दल माधव महाराज डाके शेंडगे परिवारकडून शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन महादेव नाना साळुंके यांचा सत्कार करण्यात आला...

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### तुमच्या आहारात 'या' पेयांचे समावेश केल्यास कर्करोगापासून मिळेल सुटका....



आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे तुम्ही आरोग्याकडे लक्ष देत नाही आणि त्यामुळे गंभीर आजार होऊ शकतात. तुमचं आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष द्यावे लागते. कर्करोग हा एक असा आजार आहे ज्याची लागण होण्याची भीती सर्वांनाच असते. कारण अनेकदा लोक म्हणतात की कर्करोग झाल्यानंतर एखाद्या व्यक्तीला जगणे कठीण होते. तथापि, हे पूर्णपणे खरे नाही, जर तुम्ही वेळेवर उपाययोजना केल्या आणि उपचार सुरू केले तर कर्करोगाला हरवणे शक्य होते. आम्ही तुम्हाला सांगतो की अस्वास्थ्यकर आहार, जास्त मद्यपान, तंबाखूचे सेवन, बैठी जीवनशैली आणि वायू प्रदूषण हे कर्करोगाचा धोका वाढविण्यात मोठी भूमिका बजावतात. अशा परिस्थितीत, तुम्ही तुमची जीवनशैली सुधारून आणि आहाराची काळजी घेऊन त्याचा धोका कमी करू शकता. असे अनेक अन्नपदार्थ आणि पेये आहेत जी एकूण आरोग्याला आधार देतात तसेच कर्करोग रोखण्यास मदत करतात. हार्वर्ड-प्रशिक्षित गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ सेठी यांनी त्यांच्या एका पोस्टमध्ये अशा ३ पेयांबद्दल माहिती दिली आहे, जे कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात. कर्करोग तेव्हा होतो जेव्हा असामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढतात आणि तुमच्या शरीराच्या इतर भागात पसरतात. तो जवळजवळ कुठेही सुरू होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) मते , कर्करोग हे जगभरात मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. २०२० मध्ये, कर्करोगाने सुमारे १ कोटी लोकांचा मृत्यू झाला. कर्करोगाचे १०० हून अधिक प्रकार आहेत, ज्यामध्ये स्तन, फुफ्फुस, कोलन आणि मलाशय आणि प्रोस्टेट कर्करोग सर्वात सामान्य आहे. जगभरात कर्करोगाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत, अशा परिस्थितीत या आजारापासून बचाव करण्याचे मार्ग अवलंबणे खूप महत्वाचे आहे. कर्करोग रोखण्यासाठी तुम्ही तुमच्या दैनंदिन आहारात काही पेये देखील समाविष्ट करू शकता. त्यांच्या इंस्टाग्रामवरील व्हिडिओद्वारे डॉ. सेठी यांनी तीन विज्ञान-समर्थित पेयांबद्दल सांगितले आहे जे कर्करोगाचा धोका कमी करण्यात भूमिका बजावतात. अशा परिस्थितीत, मर्यादित प्रमाणात त्यांचे नियमित सेवन तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. ग्रीन टी – ग्रीन टी हे जगातील सर्वात जास्त आवडणाऱ्या पेयांपैकी एक आहे. बहुतेक लोक वजन व्यवस्थापनासाठी याचा वापर करतात, परंतु आम्ही तुम्हाला सांगतो की ही चहा तुम्हाला अनेक प्रकारच्या कर्करोगापासून देखील वाचवू शकते. डॉक्टरांच्या मते, ग्रीन टीमध्ये कॅटेचिन सारख्या शक्तिशाली अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे कर्करोगापासून बचाव करण्यास प्रभावी असतात. याशिवाय, तुम्ही माचा देखील पिऊ शकता, जो आजच्या काळात खूप व्हायरल होत आहे. माचा हा ग्रीन टीचा एक केंद्रित प्रकार आहे. म्हणूनच तो आणखी शक्तिशाली आहे.

# ज्येष्ठा गौरी आणि श्री गणेश – आपुलकीची सांस्कृतिक धारा

. बीड गणेशोत्सवाच्या उत्साहात महाराष्ट्रात घराघरांत येणाऱ्या ज्येष्ठा गौरींचे आगमन हा भक्तिभाव , सौंदर्य आणि ऐक्याचा मंगल सोहळा असतो . सोन्याच्या पावलांनी आल्या सारख्या मानल्या जाणाऱ्या या गौरींचे आगमन म्हणजे घरात सुख , शांती आणि ऐश्वर्याची चाहूल लागल्यासारखी भावना प्रत्येक कुटुंबाच्या मनात दाटते . अंगणातल्या रंगीबेरंगी रांगोळ्या , फुलांच्या माळा , आरत्यांचे सूर आणि स्त्रियांच्या ओव्यांनी सजलेले वातावरण जणू परंपरा आणि आनंदाचा संगम घडवते .

ज्येष्ठा गौरी या पार्वतीचे रूपं मानल्या जातात , त्या शुद्धता , समृद्धी आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत . गणेश हा पार्वतीचा पुत्र असल्याने ज्येष्ठा गौरी आणि गणेश यांचे नाते हे अतिशय घट्ट , आपुलकीचे व आई-मुलाचे स्वरूप आहे . म्हणूनच गणेशोत्सवात गौरी पूजनाचे स्थान विशेष आहे . महाराष्ट्रात हा सण विशेष भक्तिभावाने साजरा होतो . गणपतीच्या आगमनापूर्वी गौरींचे स्वागत केले जाते , त्यांना फुलांची व पारंपरिक सजावटीची आरास केली जाते , विविध नैवेद्य दाखवले जातात आणि गाणी-ओव्या म्हणत वातावरण मंगलमय केले जाते .

इतिहासाच्या संदर्भात पाहिले तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात पुणे परिसरात गणेशोत्सव कौटुंबिक पातळीवर दिमाखात साजरा होत असे . पुढे लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप देत समाजातील एकात्मतेचा ध्यास घेतला . याच काळात गौरी पूजनालाही घराघरात धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले . विशेषत: स्त्रियांसाठी हा उत्सव आनंदाचा , सजावटीचा आणि सामूहिक कार्यक्रमांचा मानबिंदू बनला . ज्येष्ठा गौरींच्या आगमनामुळे कुटुंबात ऐक्य , स्त्रीशक्तीचा सन्मान आणि घराघरात सुख-समृद्धी येते अशी दृढ श्रद्धा आहे .

लोककथांनुसार गौरी या महालक्ष्मीच्या बहिणी मानल्या जातात . भक्तांच्या घरी दोन दिवसांसाठी माहेरी आल्या म्हणून त्यांचे स्वागत मोठ्या आदराने केले जाते . काही ठिकाणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा अशा दोन गौरी घरात आणल्या जातात . त्यांचे आगमन म्हणजे आईच्या रूपात आलेल्या देवीचे दर्शन . म्हणूनच त्यांच्यासाठी पारंपरिक पदार्थ बनवले जातात .

२०२५ मध्ये ज्येष्ठा गौरी अवहण रविवार , ३१ ऑगस्ट रोजी . मुख्य पूजन सोमवार , १ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजून ५९ मिनिटांपासून संध्याकाळी ६ वाजून ४३ मिनिटांपर्यंत पार पडेल . विसर्जन मंगळवार , २ सप्टेंबर रोजी होईल . या तीन दिवसांत घराघरात भक्तिभाव , सजावट आणि ऐक्याचे वातावरण असते . गौरींचे स्वागत करताना अंगणात रंगीबेरंगी रांगोळ्या काढल्या जातात , हळदीकुंकवाचे समारंभ आयोजित केले जातात आणि महिला एकत्र येऊन गाणी व ओव्या गातात .

" गौरी आई आली अंगण फुलांनी भरलं " , " ये ग ये ग गौरी , ओटी भरुन दे ग " , " गणपती बाप्पा येती सुख समृद्धी घेऊन " , " गौरी आली घरोघरी , भरभरून आली संपत्ती सारी



" अशा ओव्या पारंपरिक वातावरणाला साजेशा ठरतात . गौरी पूजनाच्या दिवशी खास जेवणाचा बेत आखला जातो . उकडीचे मोदक , घारगे , करंजी , पुरणपोळी , पिठलं-भात , डाळ-भात , पिठाचे लाडू , हळदीचे दूध असे विविध पदार्थ नैवेद्य म्हणून ठेवले जातात . या पाककृती केवळ चवीसाठी नसून परंपरेचा वारसा आणि स्त्रियांच्या कष्टाचे व कौशल्याचे दर्शन घडवतात .

गौरीची आरती

भाद्रपद शुद्ध सप्तमीस प्रतिष्ठा
अनुराधा नक्षत्र ज्येष्ठा श्रेष्ठा
गणेशा सहित गौरी धनिष्ठा
बैसली येउनि सकळिया निष्ठा ।।१||
जयदेव जयदेव जय महालक्ष्मी,
श्रीमहालक्ष्मी,
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव
जयदेव ।। धृ।।
ज्येष्ठा नक्षत्र पुजेचा महिमा
षडरस पक्वान्ने होती सुखधामा
सुवासिनी ब्राह्मण अर्पुनी निजनेमा
तुझे आशीर्वादि सकलही धामा ।।२।।
जयदेव जयदेव जय महालक्ष्मी,
श्रीमहालक्ष्मी,
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव
जयदेव ।। धृ।।
उत्थापन मूळावर होता अगजाई
वर देती झाली देवी विप्राचे गृही
रुद्र विश्वनाथ भक्ताचे ठायी
वर देती झाली देवी सकळांचे गृही ।।३।।
जयदेव जयदेव जय महालक्ष्मी,
श्रीमहालक्ष्मी,
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव
जयदेव ।। धृ।।

गौरी पूजनाचे महत्व केवळ धार्मिक नाही तर सामाजिक दृष्ट्याही आहे . हा सण म्हणजे कुटुंबातील स्त्रियांचा आत्मसन्मान , समाजातील बंधुता आणि शेजारधर्माचे प्रतिक आहे . समाजातील बंध दृढ करण्यासाठी , शेजाऱ्यांत मैत्री वाढवण्यासाठी आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी गौरी पूजनाची परंपरा आजही उपयुक्त ठरते . ज्येष्ठा गौरींचे आगमन म्हणजे घराघरात आनंदाचा , सौहार्दाचा व ऐश्वर्याचा प्रकाश पसरवणे होय .

नवीन पिढीसाठी या उत्सवाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे . आजच्या धावपळीच्या जीवनात गौरी पूजनामुळे कुटुंब एकत्र बसते , परंपरा जपल्या जातात , संस्कृतीचा वारसा पुढे नेला जातो आणि समाजात ऐक्याची भावना वाढीस लागते . गौरी पूजन हा स्त्रीशक्तीचा गौरव करणारा सण आहे . म्हणूनच ज्येष्ठा गौरींचे पूजन म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून स्त्रीशक्तीचा सन्मान , परंपरेचा वारसा आणि सामाजिक सलोख्याचा अनमोल ठेवा आहे .

# विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय-प्राचार्य अन्वर शेख

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे, असा प्रेरणादायी संदेश बीड सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्स चे अध्यक्ष तथा सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख यांनी माउंट लिटरा झी स्कूलच्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ शपथविधी समारंभात दिला. त्यांनी नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे तर इतरांसाठी आदर्श निर्माण करणे होय, असेही म्हटले. सविस्तर वृत्त असे की २०२५ २६ शैक्षणिक वर्षाचा हा महत्त्वाचा समारंभ शाळेच्या प्रांगणात अतिशय उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा परिषदेचे गटनेते अजय मुंडे तसेच परळी तहसीलचे माजी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांची उपस्थिती होती. प्राचार्य अन्वर शेख यांनी आपल्या मार्गदर्शक भाषणात




विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत नेतृत्व, जबाबदारी व समाजसेवा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी जीवनात प्रामाणिकपणा, शिस्त, वेळेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी यांवर विशेष भर देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मान्यवरांनी सांगितले की खरे नेते ते असतात जे इतरांसाठी उदाहरण ठरतात आणि त्यांच्या कृतींतून प्रेरणा देतात. शाळेच्या मतदानाद्वारे निवडले गेलेल्या कॅप्टन, हेड बॉय, हेड गर्ल व विविध हाऊस लीडर्सचा गौरव सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी देशभक्ती व नेतृत्वाची शपथ घेऊन शाळेच्या शिस्त व कार्यक्षमतेचे पालन करण्याचे आश्वासन दिले. शपथविधी संपन्न झाल्यानंतर या पदाधिकाऱ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रम शाळेचे अध्यक्ष डॉ. हरीशचंद्र वंगे दादा, उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे आणि प्राचार्य मंगेश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य जल्लोषात साजरा करण्यात आला. पाहुण्यांच्या स्वागतानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रार्थना, स्वागत गीत व देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रम प्राचार्य मंगेश काशीद यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडला. या शपथविधी समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव व संघभावना जागृत झाली आहे. पालक व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमांचे व विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे कौतुक केले.

# ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी ॲक्ट १९९९) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. जॉन्सन यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात संबंधीत विभागानी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एस. शेजाळ, गुन्हे अन्वेषण विभाग छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधिक्षक यशवंत काळे, सहजिल्हा निबंधक वर्ग-२ बीडचे एस.एम.शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर विभागचे फडणवीस सर, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड / माजलगावचे गौरव इंगोले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीडचे सतीश तोतावार, जिल्हा सरकारी वकील धनंजय वाकनकर, अवसायक सर्व वित्तीय संस्थाचे आर.एम.तोटे, श्री. साई अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बीडचे व्यवस्थापक सचिन घोडके, ज्ञानराधा मल्टी स्ट



ेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीडचे संपर्क अधिकारी गोपाळकृष्ण परदेशी, मॉ जिजाऊ मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी, बीडचे व्यवस्थापक सुरज जगदाळे यांची उपस्थिती होती.यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एमपीआयडी संदर्भातील कामकाज गतीने होण्यासंदर्भात मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश यांना पत्र देवुन सर्व कोर्टांची बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या प्रकरणामध्ये अधिसूचना प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्या संदर्भात अपर मुख्य सचिव (गृह) यांना पत्र देवून अधिसूचना प्रसिध्द करुन सक्षम प्राधिकारी नेमणेबाबत विनंती करण्यात येणार आहे. सर्व अवसायक यांना त्यांची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांना पत्र देवून मालमत्तांच्या मुल्यांकना संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी विनंती करण्यात आल्याचे सांगितले. तसेच या विषयावर पुढील बैठक एक महिन्यानंतर घेण्यात येणार असल्याचे ही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले

## लिव्ह-इन रिलेशनशिप: एक आधुनिक वास्तव



लिव्ह-इन रिलेशनशिप म्हणजे लग्न न करता, दोन प्रौढ व्यक्तींनी पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहणे. आजच्या काळात, विशेषतः शहरी आणि तरुण पिढीमध्ये, ही संकल्पना मोठ्या प्रमाणात स्वीकारली जात आहे. भारतामध्ये ही संकल्पना पाश्चात्त्य देशातून आलेली असली, तरी आता ती भारतीय समाजाचाही एक भाग बनत आहे.

या नात्यामुळे दोन व्यक्तींना एकमेकांना अधिक जवळून समजून घेण्याची संधी मिळते. लग्नापूर्वी एकत्र राहिल्याने, भविष्यात एकमेकांसोबत आयुष्य घालवू शकतो का, याची चाचणी करता येते. काही वेळेस घरखर्च, भाडे, आणि इतर खर्च वाटून घेता येतात, ज्यामुळे आर्थिक मदत होते. लग्नानंतर येणाऱ्या सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा ताण कमी असतो.

हे नाते कोणत्याही कायदेशीर बंधनात नसल्यामुळे, त्यात असुरक्षितता जाणवू शकते. जेव्हा नाते तुटते, तेव्हा त्याचा खूप मोठा मानसिक आघात होऊ शकतो. समाजात अजूनही लिव्ह-इन रिलेशनशिपला पूर्णपणे स्वीकारले गेलेले नाही. यामुळे, अनेकदा मित्रमंडळी आणि नातेवाईकांकडून सामाजिक टीकेचा सामना करावा लागतो. या नात्याला कायद्याचे संरक्षण नसल्यामुळे, जर नातेसंबंधात काही समस्या आल्या, तर कायद्याने मदत मिळवणे थोडे कठीण होते. जर हे नातेसंबंध संपुष्टात आले, तर अनेकदा महिलांना अधिक समस्यांना सामोरे जावे लागते. काही प्रकरणांमध्ये आर्थिक किंवा मानसिक छळासारख्या घटनाही घडतात.

लिव्ह-इन रिलेशनशिपचा वाढता स्वीकार भविष्यातील पिढ्यांवर परिणाम करू शकतो. याचा सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूंनी विचार करणे गरजेचे आहे. ही संकल्पना लैंगिक समानता आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व देते. त्यामुळे, भविष्यात व्यक्तींना आपल्या आयुष्याचे निर्णय घेण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळू शकते. नात्यातील अस्थिरता आणि वचनबध्दतेचा अभाव यामुळे, भविष्यात कौटुंबिक आणि सामाजिक मूल्यांमध्ये बदल होऊ शकतात. यामुळे मुलांवर आणि कुटुंबातील सदस्यांवर मानसिक परिणाम होऊ शकतो. लिव्ह-इन रिलेशनशिप हा एक गुंतागुंतीचा विषय आहे आणि त्यावर एकच योग्य उत्तर नाही. प्रत्येक व्यक्तीने आपल्यासाठी काय योग्य आहे याचा विचार करूनच निर्णय घेणे महत्त्वाचे आहे.

लिव्ह-इन रिलेशनशिप: काही प्रमुख घटना आणि कायदेशीर दाखले : लिव्ह-इन रिलेशनशिपबाबत समाजात आणि कोर्टात अनेक घटना घडल्या आहेत. या नात्याला कायदेशीर मान्यता नसली तरी, काही प्रकरणांमध्ये कोर्टाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

श्रध्दा वालकर आणि आफताब पूनावाला प्रकरण: हे प्रकरण लिव्ह-इन रिलेशनशिपमधील एक भयावह उदाहरण आहे. आफताब आणि श्रध्दा अनेक वर्षांपासून लिव्ह-इनमध्ये होते. दोघांमध्ये सतत वाद होत होते. या वादामुळे आफताबने श्रध्दाची हत्या करून तिच्या शरीराचे तुकडे केले. या घटनेने देशभरात खळबळ माजली आणि लिव्ह-इन रिलेशनशिपच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

निकिता तोमर हत्याकांड (२०२०): हे प्रकरण देखील अशाच एका नात्यातील गुन्हेगारीचे उदाहरण आहे. निकिताने एका व्यक्तीसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्यास नकार दिल्यानंतर, त्या व्यक्तीने तिची भरदिवसा हत्या केली. अशा घटनांमुळे समाजाला या नात्यातील धोके आणि गुन्हेगारीची जाणीव झाली.कायद्याची भूमिका आणि महत्त्वाचे दाखले भारतात लिव्ह-इन रिलेशनशिपला थेट कायद्याचे संरक्षण नाही, पण सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वाच्या निर्णयांमध्ये या नात्याला मान्यता दिली आहे.

डी. वेलुस्वामी विरुद्ध डी. पैचियम्माल (२०१०): या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने लिव्ह-इन रिलेशनशिपबद्दल एक महत्त्वाचा निर्णय दिला. कोर्टाने स्पष्ट केले की, 'लिव्ह-इन रिलेशनशिप' ही एक प्रकारची 'घरगुती भागीदारी' आहे. त्यामुळे जर दोन प्रौढ व्यक्ती एकमेकांसोबत स्वेच्छेने एकत्र राहत असतील, तर त्यांना कायदेशीर संरक्षण मिळू शकते.

# बनावट कागदपत्रांचा सिंडिकेट! माजलगावात माजी नगरसेवक सलीम उर्फ बापू सय्यद यांचा काळा चेहरा उघड?

## मयताच्या तारखेलाच बनावटपणाचा खेळ; 1977 ला मयत दाखवून 2025 मध्ये वारस तयार करून बनावट कागदांचा खेळखंडोबा?

बनावट प्रमाणपत्रांनी 40 एकर जमीन हडपण्याचा घोटाळा उघड; सलीम उर्फ बापू सय्यदांच्या बनावट कागदांचा अखेर भांडाफोड?

इनामी जमीन घोटाळ्यांपासून फॉर्च्युनर-स्कॉर्पिओपर्यंत माजी नगरसेवक सलीम उर्फ बापू सय्यदांच्या काळ्या पैशाच्या साम्राज्यावर आयकर विभागाची नजर?

### दहशतीचा डाव आणि भूमाफियांचा साम्राज्य?

तक्रार करणाऱ्यांवर अ‍ॅट्रोसिटी, विनयभंग, बलात्कार यांसारखे खोटे गुन्हे दाखल करून गप्प बसवण्याची ही माजी नगरसेवकाची पद्धत असल्याचे अनेकांनी उघड केले आहे. सत्तेचा आणि पदाचा वापर करून दहशत निर्माण करणे हा त्यांचा जुना फंडा आहे. स्वतःला इनामी जमीन संघटनेचा अध्यक्ष" म्हणवून घेणारे सलीम सय्यद हे प्रत्यक्षात भूमाफिया असल्याचे आता स्पष्ट होत आहे.सिरसाळा, परळी, अंबाजोगाई, जिंतूर, पाथरी, मानवत, परभणी, बीड, धारूर अशा ठिकाणीही बनावट वारस व खोटे कागदपत्रे तयार करून जमिनी हडप केल्याचा आरोप आहे. माजी नगरसेवक सलीम उर्फ बापू फत्तु सय्यद व त्याचा मुलगा समीर सलीम सय्यद व त्यांची पत्नी अफसाना सलीम सय्यद  सर्व बनावट वारस प्रमाणपत्र काढून देणाऱ्या वकील अल्ताफ सय्यद यांनी खूप मोठ्या प्रमाणामध्ये असे बनावट कागदपत्र तयार केलेले आहेत या सर्व कागदपत्र व तक्रार देण्यामध्ये या वकिलाचा खूप मोठा हातभार व हिस्सेदारी आहे या दोघांचे सुद्धा कॉल डिटेल्स तपासली पाहिजे व यांनी दिलेल्या मराठवाड्यातील सर्व कार्यालयांमध्ये यांच्या तक्रारी किती आहेत यांचे प्रकरण किती सुरू आहेत याबाबत व यांनी बनावट कागदपत्र बनवल्या प्रकरणी व न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणी यांच्याविरुद्ध लवकरच  420 अंतर्गत लवकरच गुन्हा दाखल होण्याचे संकेत आहेत या सर्व प्रकरणाची तक्रार इंजिनिअर सादिक इनामदार भ्रष्टाचार निर्मूलन समिती अध्यक्ष यांनी पुराव्यानिशी दिली आहे. त्यांच्याकडे सर्व पुरावे आहेत ते तक्रारदार आहेत.

### प्रशासन आणि जनतेचे लक्ष वेधणारे प्रकरण?

हा घोटाळा उघड झाल्यानंतर संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र राज्य महामंडळ, आयकर विभाग आणि न्यायालय या सगळ्या पातळ्यांवर आता कारवाई होण्याची चिन्हे दिसत आहेत. माजी नगरसेवक सलीम उर्फ बापू सय्यद व त्याचे साथीदार यांच्यावरती न्यायालयीन फसवणूक, इनामी जमीन हडप, काळा पैसा आणि दहशतशाहीचे गंभीर आरोप सिद्ध होत आहेत. त्यामुळे या कारवाईकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### बनावटपणाचा फडशा आणि प्रशासनाची संगनमताने खेळी?

सलीम सय्यद यांनी 1977 मध्येच मरियम बी माजलगाव येथे मृत झाल्या असे दाखवत मृत्यू प्रमाणपत्र नगरपरिषदेकडे मिळवले. त्यानंतर 2025 मध्ये वारस प्रमाणपत्र काढून पत्नीच्या नावावर हक्क मिळवण्याचा डाव रचला. पण प्रत्यक्षात मरियम बी या उस्मानाबाद जिल्ह्यातील मांडवा येथील रहिवासी होत्या आणि त्यांचा मृत्यू 2001 मध्ये झाला होता. त्यांच्या वारस म्हणून अब्दुल गफार यांची ग्रामपंचायत व कळंब न्यायालयाने नोंद केली आहे.वारस प्रमाणपत्र मिळवण्याआधीच 2021 मध्ये सलीम सय्यद यांनी उपजिल्हाधिकारी आघाव पाटील यांना हाताशी धरून जमीन खालसा करून पत्नीच्या नावावर नोंदवून घेतली. म्हणजेच न्यायालयीन व प्रशासकीय दोन्ही पातळ्यांवर संगनमताने फसवणूक घडवून आणली गेली.






बीड (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव व निपाणी टाकळी परिसरातील खिदमत मास इनामी जमीन (सर्वे नं. 100, 210) बळकावण्यासाठी माजी नगरसेवक सलीम उर्फ बापू फक्त सय्यद यांनी बनावट मृत्यू प्रमाणपत्र व वारस प्रमाणपत्र तयार करून प्रचंड गैरव्यवहार केल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. या प्रकरणात माजी नगरसेवक सय्यद यांनी त्यांच्या पत्नी श्रीमती अफसाना सलीम सय्यद यांच्या नावावर 1977 मध्येच मृत झाल्याचे दाखवत श्रीमती मरियम बी अब्दुल रजाक यांचे खोटे मृत्यू प्रमाणपत्र माजलगाव नगरपरिषदे कडे सादर केले. त्यानंतर 2025 मध्ये याच नावाने पुन्हा बनावट वारस प्रमाणपत्र मिळवले. प्रत्यक्षात मयत मरियम बी ह्या मांडवा, ता. वाशी, जि. उस्मानाबाद येथील रहिवासी होत्या व त्यांचा खरा मृत्यू 2001 मध्ये झाला होता. त्याची नोंद ग्रामपंचायत मांडवा येथे असून त्यांचा एकमेव वारस अब्दुल गफार अब्दुल रजाक असल्याचे 2007 मध्ये कळंब न्यायालयाने आदेशित केले आहे. वारस प्रमाणपत्र काढण्याच्या आधीच, 2021 मध्ये सलीम सय्यद यांनी तत्कालीन उपजिल्हाधिकारी आघाव पाटील यांच्या संगनमताने ही 40 एकर इनामी जमीन खालसा करून घेतली आणि पत्नीच्या नावावर निर्णय नोंदवून घेतला. जमिनीचा मूळ मालक आणि वारस अस्तित्वात असतानाही बनावट कागदपत्रांवर विश्वास ठेवून न्यायालयाची फसवणूक करण्यात आली. त्यामुळे आता न्यायालयीन फसवणुकीप्रकरणी गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. सदरील माजी नगरसेवक कोणत्याही व्यक्तीने तक्रार केली तर त्यांच्यावर अ‍ॅट्रोसिटी, विनयभंग, बलात्कार यासारखे खोटे गुन्हे दाखल करून तक्रार मागे घेण्यास भाग पाडतो, अशी गंभीर आरोपांची नोंद आहे. सलीम उर्फ बापू सय्यद स्वतःला इनामी जमीन संघटनेचा अध्यक्ष म्हणून मिरवत असला तरी त्याच्या विरोधात इनामी जमीन घोटाळे, गायरान जमीन बळकावणे, संजय गांधी श्रावणबाळ योजनेंतर्गत चिरीमिरी घेणे असे गंभीर आरोप आहेत. त्याच्या मुलगा समीर सलीम सय्यद कडे आज महागड्या फॉर्च्युनर, स्कॉर्पिओ गाड्या आणि मोठी प्रॉपर्टी असून, कुठलाही अधिकृत व्यवसाय नसताना एवढी संपत्ती उभी केल्याबद्दल आयकर विभागाचीदेखील चौकशी लवकरच होणार असल्याचे संकेत आहेत. या प्रकरणात वकील अल्ताफ सय्यद यांनी बनावट वारस प्रमाणपत्रासाठी वकिलपत्र देऊन सहकार्य केले असल्याचा ठोस आरोप आहे. याच पद्धतीने मराठवाड्यातील सिरसाळा, परळी, अंबाजोगाई, जिंतूर, पाथरी, मानवत, परभणी, बीड, धारूर, माजलगाव अशा ठिकाणी अनेक इनामी जमीन प्रकरणांमध्ये बनावट वारस व बनावट कागदपत्रे तयार करून लाखो रुपयांचे व्यवहार करण्यात आले आहेत.

# राजकीय, शासकीय, खाजगी कार्यक्रमाला सेवा न देण्याचा निर्णय

अंबाजोगाई । प्रतिनिधी  पोलिस प्रशासनाने डीजेवर घातलेल्या बंदीच्या आदेशाचा निषेध करीत अंबाजोगाई साऊंड लाईट, मंडप व जनरेटर असोसिएशनने आक्रमक भूमिका घेतली आहे. असोसिएशनच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत कोणत्याही राजकीय, शासकीय किंवा खासगी कार्यक्रमांना साऊंड, लाईट, जनरेटर, फोकस, मंडप, वायर, डेकोरेशनसह कोणतेही साहित्य पुरविणार नाही, असा ठराव करण्यात आला. असोसिएशनने स्पष्ट इशारा दिला की, जर कोणत्याही व्यावसायिकाने साहित्य पुरविलेच तर त्यावर असोसिएशनकडून कारवाई करण्यात येईल. इतकेच नव्हे तर असे साहित्य थेट जप्त करण्यात येईल. याचा पहिला प्रयोगही आज करण्यात आला. शहरातील एका दवाखान्याच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनावेळी लावण्यात आलेले साऊंड व मंडप साहित्य असोसिएशनने जप्त करून आणले. मंडप साहित्य असोसिएशनचे तालुकाध्यक्ष अशोक बलुतकर, उपाध्यक्ष राजाभाऊ कोंबडे, कोषाध्यक्ष अर्जुन गवळी, सचिव अशोक गोचडे तसेच अंबाजोगाई तालुका साऊंड असोसिएशनचे तालुकाध्यक्ष सतिश केंद्रे, उपाध्यक्ष संतोष साबणे, कोषाध्यक्ष कृष्णा वाघमारे आणि सचिव प्रविण कराड या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही स्वच्छ, मर्यादित वाजणारा



साऊंड वापरून व्यवसाय करतो. मात्र पोलिस प्रशासनाने कोणती ही शिस्तबद्ध तडजोड न करता थेट बंदी घातल्याने आम्हाला हा कठोर निर्णय घ्यावा लागला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, डीजेचा वापर पूर्णतः बंद असला तरी आमचा व्यवसाय साऊंड, लाईट, मंडप व जनरेटर यावर अवलंबून आहे. प्रशासनाकडून बंदी कायम राहिली तर ज्यांची उपजीविका या व्यवसायावर अवलंबून आहे असे शेकडो ऑपरेटर, वायरमन, ड्रायव्हर, साऊंड इंजिनिअर यांच्यासह अनेक तंत्रज्ञ, कामगार यांच्या कुटुंबातील हजारो नागरिक हे उपासमारीला सामोरे जातील. यावेळी अंबाजोगाई तालुका साऊंड, मंडप, लाईट व जनरेटर असोसिएशनचे पदाधिकारी इंजिनिअर मयुर परदेशी, नागेश गुजर, माऊली शेप, सुनिल कलशेट्टी, गोरख जगताप, अनिकेत डाके, बालाजी मारवाळ, विशाल व्हावळे, उदय पाटील, गोरक्ष खोडवे, अभिषेक धायगुडे, कुणाल भोसले, अजय सुरवसे, अमित तरकसे, समाधान गायकवाड, रवि मारवाळ, अनिकेत सपकाळ, ओम काळे, प्रेम व्हावळे, ऋषिकेश काळे, विकास क्षिरसागर, केशव गुट्टे, अमित व्हावळे, ऋतुराज धायगुडे, सचिव पवार यांच्यासह ८० हून अधिक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. अंबाजोगाई साऊंड-लाईट मंडप व जनरेटर असोसिएशनने घेतलेल्या या निर्णयामुळे शहरासह तालुक्यातील राजकीय, शासकीय व खासगी कार्यक्रमांवर परिणाम होणार आहे. पुढील काही दिवसांत विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम, उद्घाटने, राजकीय व शासकीय कार्यक्रमांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# मराठा आरक्षणावरून राज ठाकरे-एकनाथ शिंदे आमनेसामने, त्या टीकेला शिंदेंकडून चोख प्रत्युत्तर!

मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाची सध्या राज्यभरात चर्चा आहे. मुंबईच्या आझाद मैदानावरील त्यांच्या उपोषणाला तीन दिवस झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे अशी त्यांची मागणी आहे. पण सरसकट मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाल्यास राज्यात ओबीसींमध्ये मोठा असंतोष निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आता राज्य सरकार कात्रीत सापडले आहे. जरांगे यांच्या या आंदोलनामुळे आता राज्यातील इतर सर्वच विषय मागे पडले आहेत. प्रमुख नेतेदेखील या आंदोलनावर लक्ष ठेवून असून ते यावर बोलत आहेत. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनीदेखील माध्यम प्रतिनिधींना मराठा आरक्षणावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली होती. आता राज ठाकरे यांच्या याच टीकेला एकनाथ शिंदे यांनीही प्रत्युत्तर दिले आहे. एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?राज ठाकरे यांनी पूर्ण माहिती



घ्यायला हवी होती. खरं म्हणजे मराठ्यांचं आरक्षण ज्यांच्यामुळे गेले त्यांनाच ते का गेले हे राज ठाकरे यांनी विचारायला हवे होते. तुम्ही मराठ्यांना आरक्षण देण्यात अयशस्वी कसे झाले? हे राज ठाकरे यांनी त्यांना विचारायला हवे होते. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. आम्ही ते आरक्षण उच्च न्यायालयात टिकले

## अनेक मराठा लोकांना कुणबी प्रमाणपत्रं दिली

त[illegible], पण ठीक आहे. लोकांना आम्ही काय केलं हो समजावं म्हणून मी हे सांगत आहे. आम्ही मराठा समाजाला 10 टक्के आरक्षण दिले. निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखील समितीची स्थापना करून आपण अनेक मराठा लोकांना कुणबी प्रमाणपत्रे दिली. शिंदे समितीने 1967 पूर्वीच मोठ्या प्रमाणात कुणबी नोंदी शोधल्या. त्याचाही लाभ मराठा समाज घेत आहे, अशी माहितीही एकनात शिंदे यांनी यावेळी दिली.

होते. मात्र महाविकास आघाडी तेच आरक्षण सर्वोच्च न्यायालयात का टिकवून शकली नाही, हा प्रश्न राज ठाकरेंनी विचारायला हवा होता, असे प्रत्युत्तर एकनाथ शिंदे यांनी दिले. जरांगेंच्या मागण्यांवर काय तोडगा निघणार दरम्यान, आता जरांगे यांच्या मागण्यावर तोडगा काढण्यासाठी मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचा अभ्यास चालू आहे. तसेच निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांची समितीदेखील काय तोडगा शोधता येईल, यावर अभ्यास करत आहे. त्यामुळे आता भविष्यात जरांगे यांच्या मागण्यांचे काय होणार? सरकार जरांगे यांचे समाधान करू शकणार का?

# सततच्या पावसामुळे पाटोदा तालुक्यात खरीप पिकाचे मोठे नुकसान

पाटोदा । प्रतिनिधी पाटोदा तालुक्यात गेल्या पंधरा दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले आहे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांच्या झालेल्या खरीप पिकाचे नुकसानीचे पंचनामे करून राज्य सरकारने शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहे पाटोदा तालुक्यात गेल्या पंधरा दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतामध्ये पाणीसा असल्याने खरीप पिकाचे मोठे मुस्कान झालेले दिसत आहे शेतकऱ्यांची शेती उपळली असून शेतकऱ्यांचे सोयाबीन कापूस पिक पूर्णपणे वाया गेले आहे वडील पीक काढण्याच्या अवस्थेत असताना पावसाने उघडणे दिल्याने उडीद मूग पिकाची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसत आहे. शेतकऱ्यांनी मागामावल्याचे बी घेऊन खते बी पेरली आहेत मात्र तालुक्यात गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांची खरीप पिकाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी झाला आहे शेतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना एकमेव उत्पन्नाचा मार्ग खरीप पिक तेही हातातून गेल्याने शेतकरी अहवाल दिन वर्थ आर्थिक मोठ्या संकटात सापडलेला दिसत आहे शेतकऱ्यांना आर्थिक आधार म्हणून शासनाने तालुक्यात झालेल्या शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे अनुष्काळीचे पंचनामे करावे व पंचनामाच्या आधारे राज्य सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी व आधार द्यावा अशी शेतकऱ्याकडून मागणी होत आहे.



## शेख एहतेशाम यांची काँग्रेसच्या शहर उपाध्यक्ष पदी निवड

बीड (प्रतिनिधी)-शेख एहतेशमामुद्दीन शेख काझीमुद्दीन यांची काँग्रेसच्या शहर उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे . त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे व बीड शहरध्यक्ष परवेज कुरेशी यांची उपस्थितीमध्ये देण्यात आले.भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पार्टीची नवीन कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली आहे..नक्कीच या पुढे पक्ष्याचा विस्तार आणि विकास या साठी आम्ही प्रयत्नशील असू.



बीड : लोक सांस्कृतित नंदीबैल घेऊन गावोगावी फिरणारे लोक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात नंदी बैलाला सजवून शहरातील मित्र नगर भागात लोकांना त्यांचे भविष्य सांगून आपला चरितार्थ चालविताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी टिपलेले छायाचित्र .

# करचुंडी येथील गायरान प्रश्न १३ व्या दिवशी धरणे आंदोलन सुरूच

बीड । प्रतिनिधी करचुंडी येथील ग्रामस्थ गेल्या तीन पिढ्यापासून गायरान जमीन कसून आपली उपजीविका भागवत आहेत. काही लोकांचे नाव सातबारा ला लागले आहेत. तर काही लोकांचे नाव सातबारा मध्ये अद्याप लागले नाही. या मागणीसाठी १८ ऑगस्ट पासून हे बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. त्याची अद्याप दखल प्रशासनातील कुठल्याच अधिकाऱ्याने घेतलेला आहे. या धरणे आंदोलनकर्त्यांमध्ये चार लोक आजारी



पडले आहेत. गावात पिण्याच्या पाण्याचे व्यवस्था नाही, धड काँक्रीटचे व्यवस्थित रस्ते नाही, दलितांसाठी स्मशानभूमी नाही, नळ योजना आल्या पण फक्त कागदावरच खूप मोठा भ्रष्टाचार गावामध्ये झाला आहे. घरकुल योजना देखील काही ठराविक लोकांना दिली गेली त्यात मागासवर्गीय लोकांना डावला गेला आहे. राहिलेल्या लोकांच्या नावे सातबारावर नावे लावावी अशा मागणीसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. जोपर्यंत प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत मी आपल्याला बंद होणार नाही अशी भूमिका आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयसिंग वीर यांनी घेतले आहे.

# पाकिस्तानला सर्वात मोठा धक्का!

## चीनने शरीफ यांची साथ सोडली, 'या' मुद्द्यावर भारताला दिला पाठिंबा

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेसाठी चीनला गेलेले आहेत. या परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात एक महत्त्वाची बैठक झाली. यावेळी महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. या बैठकीत पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानातील दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. याचा भारतासह चीनलाही फटका बसू शकते असं मोदींनी म्हटलं आहे. त्यामुळे आता चीनने दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे पाकिस्तानला फटका बसला आहे. चीनचा भारताला पाठिंबा भारत बऱ्याच वर्षांपासून दहशतवादाचा सामना करत आहे. भारताचा शत्रू देश पाकिस्तान दहशतवाद्यांना पोसत आहे, हेच दहशतवादी भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करत आहे. त्यामुळे शी जिनपिंग यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मोदींनी सीमापार दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. तसेच याचा चीनलाही धोका असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे आता चीनने याबाबत भारताला पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानी दहशतवाद्यांवर बोलताना भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री हे म्हणाले की, 'आज झालेल्या बैठकीप पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. भारत आणि चीन या दोघांनाही याचा धोका आहे. त्यामुळे या दहशतवादाला तोंड देण्यासाठी आपण एकमेकांना पाठिंबा देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पाकिस्तानी दहशतवाद्यांसोबत लढण्यासाठी भारताला चीनचे सहकार्य मिळाले आहे.' सीमावादावरही चर्चा

आज झालेल्या बैठकीत चीनसोबत असलेल्या सीमा वादावरही चर्चा झाली. सीमेवर शांतता राखणे हे भारत-चीन संबंधांसाठी महत्वाचे आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांना सांगितले. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पूर्व लडाखमध्ये दोन्ही देशांमधील सैन्यात



तणाव निर्माण झाला होता, मात्र आता हा प्रश्न कायमचा सुटण्याची शक्यता आहे. चीनने दिला होता पाकिस्तानला पाठिंबा पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले होते. यावेळी चीनने पाकिस्तानला पाठिंबा दिला होता. भारताने पाकिस्तान आणि पीओकेमधील 9 ठिकाणी हवाई हल्ले करत 100 पेक्षा जास्त दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला होता. पाकिस्तानने ड्रोनने भारतावर हवाई हल्ला करण्याचा प्रयत्नही केला होता, या तणावाच्या काळात तुर्की आणि चीनने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला होता. या काळात पाकिस्तानने चिनी लढाऊ विमाने आणि तुर्की ड्रोनचा वापर केला. मात्र काही दिवसांनंतर युद्धबंदी झाली. त्यानंतर आता दहशतवादाबाबत चीनने भारताला पाठिंबा दिला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
सोमवार १ सप्टेंबर २०२५
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. आज सायंकाळी या आंदोलनाची मुदत संपली होती, मात्र मुंबई पोलिसांनी आणखी एका दिवसासाठी या आंदोलनाला परवानगी दिली आहे. आता उद्याही मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरु राहणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांचे पथक, क्यूआरटी, आरएएफ तसेच विशेष दल सोमवारीही मुंबईत तैनात राहणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# एक तर मुंबईतून विजयी यात्रा निघेल, नाही तर माझी प्रेतयात्रा

## मनोज जरांगे पाटील यांचा सरकारला निर्वाणीचा इशारा

मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. आज खासदार सुप्रिया सुळे यांनी आझाद मैदानावर जात जरांगे पाटलांच्या तब्येतीची विचारपूस केली. मात्र जरांगे पाटील झोपले असल्याचे या दोघांमध्ये कोणतीही खास चर्चा झाली नाही. मात्र आझाद मैदानातून बाहेर पडत असताना सुप्रिया सुळे यांना घेरण्याचा प्रयत्न मराठा आंदोलकांकडून करण्यात आला. यावर आता जरांगे पाटलांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच जरांगे पाटलांनी सरकारला निर्वाणीचा इशाराही दिला आहे.

